सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - अवधुत देविदास लोळगे,
वय - ५० वर्षे, व्यवसाय-मजुरी,
राहणार - प्रवरासंगम, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. एच. चव्हाण यांचे मार्फत सुरुः-

पोलिसांनी मला नेवासा पोलिस स्टेशन येथे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. तिथे पोलिसांनी माझी पंचनाम्यावर सही घेतली. पंचनामा मी वाचुन पाहिला नाही. माझी सही मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला वाहन व वाळु जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अनुक्रमांक १ ला माझी सही आहे, त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस निशाणी २० देण्यात येते.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७/०१/२०१९ रोजी मला नेवासा पोलिस स्टेशनचे पो.हेड.कॉ. श्री.गिते यांनी मला नेवासा पोलिस स्टेशनला जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी मला सांगितले की, ज्ञानेश्वर मंदीर ते नेवासा जाणा-या रोडवर वाळुची अवैध वाहतुक होत आह त्याठिकाणी कारवाई करुन पंचनामा करणे आहे त्यामुळे तुम्ही पंच म्हणुन कारवाईसाठी चला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी, पोलिस स्टाफ व दुसरे पंच ज्ञानेश्वर मंदीर कमानी जवळ कारवाईसाठी थांबलो होतो. हे म्हणेणे खरे नाही की, त्यावेळी तिथे एक पांढ-या रंगाचा ४०७ मॉडेलचा टेम्पो क्र. एम. एच. ०४ ई. एल. ७६०३ हा येताना दिसला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी सदर टेम्पो चालकास हाताने इशारा करुन टेम्पो थांबवण्यास सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, त्या टेम्पोमध्ये वाळु मिळुन आली. हे म्हणणे खरे नाही की, टेम्पो चालकांस त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सागर रघुनाथ पवार असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, टेम्पो चालकाच्या बाजुस बसणा-या इसमांस त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव कडुबाळ लक्ष्मण थोरात असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्याचेकडे वाळु परवाणाबाबत विचारपुस केली असता परवाना नसल्याबाबत त्याने सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीस छडतीचा उद्देश सांगुन त्याची झडती घेतली. हे

म्हणणे खरे नाही की, सदर टेम्पोमध्ये अंदाजे रक्कम रुपये १०,०००/- किंमतीची एक ब्रास वाळु मिळुन आली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष सदर वाहन व वाळु जप्त केली व त्याप्रमाणे सविस्तर पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपींतर्फे ॲड. जे.बी. इनामदार यांनी नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), नेवासा

दिनांक-०७/०४/२०२५.